# देगलूर महाविद्यालयात मतदार नोंदणी शिबिर

देगलूर : देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व तहसील कार्यालय देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने नव मतदार नोंदणी शिबिर सोमवारी (ता.पाच) डिसेंबर रोजी देगलूर महाविद्यालयात संपन्न झाले. ज्या विद्यार्थ्यांचे वय (ता. एक) जानेवारी २०२३ रोजी १८ वर्ष पूर्ण होत आहेत. अशा ३८ विद्यार्थ्यांनी मतदार यादीत नाव नोंदवून राष्ट्रीय कार्यात योगदान दिले. उत्तम शासनकर्ते निर्माण करण्यासाठी मतदारांचे प्रमाण वाढने आवश्यक आहे व प्रत्येक मतदाराने मतदानाचे पावित्र्य राखून मतदान केले तरच प्रगल्भ लोकशाही टिकण्यासाठी मदत होईल असे मत प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी व्यक्त केले. या वेळी निवडणूक विभागाचे




**देगलूर : तहसील कार्यालयाच्या वतीने येथील देगलूर महाविद्यालयात शिबिर घेण्यात आले.**

नायब तहसीलदार रामराव पंगे, अनिल दुगाने यांनी मतदार नोंदणी कशी आवश्यक आहे याबद्दल सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी ऊपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपपाचार्य प्रा. चमकुडे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, प्रा. बालाजी कोंकटवार यांच्यासह कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.बी. आर. कतूरवार तर प्रा. संग्राम पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

Scanned with OKEN Scanner